<u>कबुली</u>

## <u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फौजदारी न्यायालय क्र.४, पुणे यांचे न्यायालयात</u>

विश्रामबाग पोलिस स्टेशन, पुणे      **सं.फौ.ख.क्र. 36270/२०२२**

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | : १७ / ०६ /२०२२ |
| २. | तक्रारीची तारीख | : १७ / ०६ /२०२२ |
| ३. | फिर्यादीचे नांव | : आर.आर.नराय. ~~पोलिस~~ ठाणे पो.हवा.५७३८ यु.७, गु.शा. पुणे. |
| ४. | आरोपी नांव, वय, पत्ता | : अंकुश मारुती भुरुक रा. आंबेगाव, पुणे |

५. आरोपाचा तपशील दि.१७/६/२०२२ रोजी तुम्ही शाळा/महाविद्यालयचे १०० मी. आत परिसरात सिगारेट व इतर तंबाखु उत्पादने विक्री करत असतांना मिळून आलात. म्हणून तुम्ही **सिगारेट व तंबाखु उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार, वाणिज्य, उत्पादन, पुरवठा आणि वितरण विनियमन) अधिनियम, २००३ चे कलम ६ दंडनीय कलम २४** अन्वये गुन्हा केला आहे.

६. तुम्हाला कागदपत्राच्या प्रती मिळाल्या आहेत काय ?

उत्तर :- होय.

७. तुम्हाला गुन्हयाचा तपशील समजला आहे काय ?

उत्तर :- होय.

८. तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर :- होय.

समक्ष

आरोपीची सही

पुणे

दि.१३ / ०८ /२०२२

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.४, पुणे.

आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबुल केला आहे त्यामुळे त्यास दोषी धरण्यात येत आहे. शिक्षेसाठी आरोपीचे म्हणणे ऐकले. आरोपीने प्रथमच गुन्हा केला असून त्याचेवर संपूर्ण कुटूंब अवलंबून आहे, त्यामुळे कमीत कमी दंड करण्यात यावा अशी विनंती केली आहे. आरोपीवर असलेल्या गुन्हयाचे स्वरूप पाहता न्यायाचे दृष्टीने पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५२ अन्वये **सिगारेट व तंबाखु उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार, वाणिज्य, उत्पादन, पुरवठा आणि वितरण विनियमन) अधिनियम, २००३ चे कलम ६ दंडनिय कलम २४** या गुन्हयासाठी दोषी ठरविण्यात येत असून आरोपीस रक्कम रूपये २००/- (अक्षरी रू. दोनशे फक्त) दंडीत करण्यात येत आहे. आरोपीने दंडाची रक्कम न भरल्यास त्यास ७ दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा भोगावी, असा आदेश पारीत करण्यात येत आहे.

(प. घ. तापडिया)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.४, पुणे.

पुणे

दि.१३ /०८ /२०२२

Fine/~~Penalty~~ Paid Rs. 200/-

R. No. 275

Date: 13 AUG 2022

VS900

Asstt. Supdt.
J. M. F. C. Court No.
Pune - 5

13 AUG 2022